# महाराष्ट्र शासन

क्र. ८६८ /मअसे
दूरध्वनी : २६८७ ११४४
फॅक्स क्र.: २६८७ ०३२५

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय**
द्वारा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
अग्निशमन विभाग, महाकाली गुंफा मार्ग,
अंधेरी (पू), मुंबई – ४०० ०९३
दिनांक : ०७ ऑक्टोबर, २०१०

## परिपत्रक

**'अग्निशमन सेवा'** ही अत्यावश्यक सेवा असून अग्निशमन सेवेच्या कार्यकक्षेत येणाऱ्या आपत्कालिन परिस्थितीत जिवीत व वित्तहानी टाळणे हे या सेवेचे मुळ उद्दीष्ट आहे. अग्निशमन सेवेत कार्य करीत असताना नेहमीच विविध प्रकारची आव्हाने व प्रसंग येत असतात. आग विझविणे अथवा विमोचनाचे कार्य करणे यासाठी अग्निशमन केंद्रात विविध अग्निशमन वाहने व उपकरणांचा वापर केला जातो.

०२. अग्निशमन कार्यासाठी राज्यात बहुतांश ठिकाणी भासणारी अग्निशमन वाहनांची व कर्मचारी वर्गाची कमतरता, अरूंद रस्ते व तत्सम अडचणी याच बरोबर पाण्याचे दुर्भीक्ष लक्षात घेता अग्निशमन वाहनांवर **'हाय-लो प्रेशर'** पंप बसवणे ही काळाची गरज झाली आहे. सध्या भारतात अशा प्रकारच्या हाय-लो प्रेशर पंपाकरीता अदयापी कोणतेही मानक अस्तित्वात नाही. तथापि, हाय-लो प्रेशर पंपाकरिता EN-1028 हे आंतरराष्ट्रीय मानक उपलब्ध असून अग्निशमन वाहनांवरील हाय-लो प्रेशर पंप बसविताना EN-1028 मानांकनास अनुसरून तपासणी व प्रमाणित असणे गरजेचे आहे. याबाबत आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त संघटना जसे TCE/EIL/TUV/SGS/UL यापैकी कोणत्याही संस्थेकडून सदर पंप EN-1028 प्रमाणे प्रमाणित असणे आवश्यक आहे.

०३. नवीन अग्निशमन वाहने खरेदी करताना **हाय-लो प्रेशर** पंपाचा अंतर्भाव करावा. जर अग्निशमन वाहनांवर असणारे जुने प्रचलीत पंप जे IS- 950/ 951/ 6067 प्रमाणे वापरात असतील व विशेष देखभाल दुरूस्ती अंतर्गत बदलणे आवश्यक असतील त्यावेळेस असे जुने पंप बदलताना **हाय-लो प्रेशर** पंपाचा अंर्तभाव करावा असे हे कार्यालय निर्देश देत आहे.

७/१०/१०

**(एम. व्ही. देशमुख)**
संचालक
महाराष्ट्र अग्निशमन सेवा

प्रति,

१) आयुक्त / मुख्याधिकारी,
सर्व महानगरपालिका/नगर परिषदा/ नगरपंचायती,

२) मुख्य कार्यकारी अधिकारी,
म.औ.वि.म./सिडको

३) मुख्य अग्निशमन अधिकारी / अग्निशमन सेंवाचे प्रमुख,
सर्व महानगरपालिका /विशेष नियोजन प्राधिकरणे/ नगरपरिषदा / नगरपंचायती.